वाचले:

१. विभाग अधिकारी (प्रशासन), राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग सामाजिक न्याय एंव अधिकारिता, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे संदर्भ क्र. २००१२/०१/HCP/२०२३-Admin/०१५९, दिनांक ०५/०३/२०२५
२. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.लापास-२०२४/अनौ.सं.क्र.११६/प्र.क्र.८२/ नवि-६, दिनांक ०७/०३/२०२५
३. मा. आयुक्तसो यांचा दिनांक ११ /०३/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग,
क्र: साप्रवि/०२/कावि/१४९/२०२५
दिनांक : ११/०३/२०२५

विषय : नोडल अधिकारी नियुक्त करणेबाबत.

**सुधारीत आदेश,**

'हाताने मैला उचलणा-या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३' (The Prohibition of Employment as Manual Scavenger and their Rehabilitation Act, 2013) बाबत आढावा घेण्याकरीता मा. श्री. एम. व्यंकटेशन, मा. अध्यक्ष (केंद्रीय राज्यमंत्री दर्जा) राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, नवी दिल्ली व मा. सदस्य डॉ. पी. पी. वावा यांचा महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक ०९/०३/२०२५ ते दिनांक १३/०३/२०२५ या कालावधीमध्ये पूर्वनियोजीत मुबंई दौरा आयोजीत करण्यात आलेला आहे. दरम्यान मा. अध्यक्ष, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, नवी दिल्ली यांच्या समवेत पिपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिका-यांच्या बैठकीचे आयोजन **दिनांक १३/०३/२०२५ रोजी दुपारी ३ : ०० वाजता सह्याद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई** येथे करण्यात आलेले आहे.

सबब, राजशिष्टाचाराची मूलतत्वे विचारात घेवून मा. अध्यक्ष (केंद्रीय राज्यमंत्री दर्जा) राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, नवी दिल्ली यांची प्रतिष्ठा व विशेषाधिकार यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्याकरीता तसेच महापालिकेशी संबंधित माहिती सादर करणे, कार्य आणि कर्तव्ये परिणामकारकपणे आणि दक्षतेने पार पाडण्याकरीता श्री. अण्णा यशवंतराव बोदडे, उपआयुक्त (झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग) यांची नोडल अधिकारी म्हणून तसेच श्री. सचिन मारुतराव पवार, उप आयुक्त (आरोग्य विभाग) यांची सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, संबंधित अधिकारी,
प्रत, सर्व संबंधित विभाग

११.०३.२५
सहा. आयुक्त (सा.प्र.वि.)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,